क्रमांक : १०३०४ /क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : ४ जुलै, २०२१

संदर्भ :- १) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.डी.ओ.आय.२०८१/ ४७०१/एडीएम-५, दि.२६/०४/१९८२
२) महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी, १९९८
३) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१/१०/२००५
४) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२
५) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.टीआरए-११६३/२७२६-व्ही, दि.२३/१०/१९६३
६) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४५/विमा प्रशासन, दि.०४/०२/२०१६

**:: परिपत्रक ::**

राज्य शासकीय सेवेत नियुक्ती झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडून नियुक्तीचेवेळी शासन नियम व निर्णय याच्या अधीन राहून त्यांनी त्यांची कौटुंबिक माहिती तथा नामनिर्देशन करणे बंधनकारक आहे. त्यानुसार शासन सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांनी खालील नमूद केलेली विविध प्रपत्रे भरुन कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

१) गट विमा योजना, १९८२ चे प्रपत्र क्रमांक ७,

२) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ अन्वये अनुसूची- एक मधील 'नमुना-अ' व परिशिष्ट-पाच- 'नमुना-१' व 'नमुना-२',

३) राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेचे सदस्यत्वाकरीताचा PRAN नमूना व DCPS/NPS करिता Form-1,

४) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ११६ (१४) (अ) (१) नुसार नमुना-३ अन्वये कुटुंबाचा तपशील,

५) स्वग्राम घोषणा व अपघात विमा नामनिर्देशन जोडपत्र-४

या सचिवालयातील अधिकारी/ कर्मचारी यांचेकडूनदेखील त्यांच्या नियुक्तीच्यावेळी नामनिर्देशनाचे आवश्यक नमूने भरुन घेण्यात आलेले आहेत.

सदर नामनिर्देशनपत्र सादर करताना दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त झालेले अधिकारी/ कर्मचारी तसेच दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा तदनंतर शासकीय सेवेत दाखल झालेले अधिकारी/ कर्मचारी अशी वर्गवारी करण्यात आली आहे.

या सचिवालयातील ज्या अधिकारी/ कर्मचारी यांनी यापूर्वी भरुन दिलेल्या उपरोक्त नमुन्यातील नामनिर्देशनामध्ये सुधारणा करावयाच्या असल्यास अथवा नव्याने भरुन द्यावयाचे असल्यास अशा सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्याकरिता या सचिवालयाच्या (http://mls.org.in/download.aspx) या संकेतस्थळावर उपरोक्त सर्व नमूने उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. ईच्छुक अधिकारी/कर्मचारी यांनी सदर नामनिर्देशनाचे नमुने त्यांच्या विनंती अर्जासह **शुक्रवार, दिनांक ३० जुलै, २०२१ रोजीपर्यंत** 'क-१' (आस्थापना) कक्षाकडे पाठविण्यात यावेत.

**( जयवंत राणे )**
अवर सचिव (समिती),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
३) मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी (प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांसह)
६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष
७) संगणक (क-२) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता)
८) निवडनस्ती